# • ग्रामीण विज्ञान छंद मंडळ •

सन १९७८-७९ पासून ग्रामीण भागातील शाळांमध्ये राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली विज्ञान छंद मंडळ कार्यरत आहेत. या मंडळाद्वारे विद्यार्थ्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन व विज्ञान विषयक अभिरूची वाढविण्यावर भर दिला जातो. विज्ञान छंद मंडळाद्वारे शालेय सत्रात विज्ञान विषयक विविध उपक्रम राबविले जातात. उदा. वैज्ञानिकांची जयंती पुण्यतिथी, विज्ञान प्रदर्शन, विज्ञान मेळावा, प्रश्नमंजुषा वैज्ञानिक गप्पा, विविध स्पर्धात्मक परिक्षा, आरोग्य स्वच्छता, पर्यावरण सुरक्षा इ. विषयाबाबत जाणीव जागृती करण्याच्या दृष्टीकोनातून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. तसेच नैसर्गिक प्रेक्षणीय स्थळे व औद्योगिक क्षेत्रामध्ये सहलीचे आयोजन.

एक विसाव्या शतकातील आव्हाने पेलता यावीत यासाठी विज्ञानमय वातावरणाची निर्मिती करून समाजातील अंधश्रध्दा, गैरसमजुती दूर करून विद्यार्थ्यांना विज्ञानाच्या जाणीवा अंगी बाळगून स्वतःचा असा विज्ञान छंद मंडळाचा हेतू आहे.

दरवर्षी राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर यांचे मार्फत उत्कृष्ट कार्य करणा-या ग्रामीण विज्ञान छंद मंडळाचा प्रशस्तीपत्र व रोख स्वरूपातील बक्षीस देवून गौरविण्यात येते.